पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/०४/२०२४
## दि.१६/०४/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे.९६/२०२४,भादविक ३०७,३४ सह भारतीय हत्यार कायदा क.३(२५),महा. पोलीस अधि.क.३७ (१),सह १३५ |
| **फिर्यादी** | धीरज अरगडे, वय ३८ वर्षे,रा.खडकी पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम,(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०४/२०२४ रोजी १४/४५ वा.चे दरम्यान अरगडे हाईट्स बिल्डींग खाली जंगली महाराज रोड,शिवाजीनगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ऑफिसवरून काम संपवून राहते घरी जाणेसाठी गाडीमधून निघाले असता, वर नमूद दोन अनोळखी इसम पल्सर मोटार सायकलवरून येऊन फिर्यादीचे गाडीच्या ड्रायव्हिंग बाजूच्या दरवाज्यास चिटकून त्यांची गाडी उभी करून गाडीच्या पाठीमागे बसलेल्या अनोळखी इसमाने त्याचे हातातील पिस्टल बाहेर काढून फिर्यादीवर रोखून त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने पिस्टल कॉक करून फायर केला असता फायर न झालेने त्याने पुन्हा पिस्टल कॉक करून फिर्यादीवर रोखून फायर करण्याचा प्रयत्न केला परंतू फायर झाला नाही.फिर्यादी घाबरून आरडाओरड करू लागल्याने ते दोघे त्यांचे गाडीवरून पळून गेले. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी.चंद्रशेखर सावंत मो.न.९५११६७५९६१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे.८०/२०२४,भादविक ३८०,४५४,४५७ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६५ रा.शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०४/२०२४ रोजी सकाळी ०६/०० वाजता ते १६/०४/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वाजताचे दरम्यान प्रताप अपार्टमेंट,चौथा मजला,तांबे बोळ,२८५, शनिवार पेठ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराच्या दरवाज्याची कडी तोडुन घरा मध्ये प्रवेश करून, कपाटातील रोख ४०००/- रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ३,५६,०००/- किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुप्रिया पंढरकर,मो.नं.९६९९०११९४२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे.१४६/२०२४,भादविक २७९,३०४(अ) ३३८ |
| **फिर्यादी** | मल्हारी खुरंगळे वय ३१ वर्षे, रा.सिंहगड रोड पुणे |
| **आरोपीत** | पी.एम.पी.एम.एल बस वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०४/२०२४ रोजी दुपारी १५/२५ वा सुमारास स.नं.१३२,दांडेकर पुल,सिंहगड रोड येथील इंडीयन ऑईल पेट्रोल पंपासमोरील पी.एम.पी.एम.एल बस स्टॉपवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची आई नामे काशीबाई खुरंगळे वय ६० वर्षे,रा.स.नं.१३४,दांडेकर पुल |

| | |
|---|---|
| | सिंहगड रोड पुणे हया वर नमुद ठिकाणा वरुन पी.एम.पी.एम.एल बसमधील पाठीमागील दरवाजामधुन आतमध्ये चढवत असताना वरील बस चालक यांने आपल्या ताब्यातील पी.एम.पी.एम.एल बस ही बेदराकारपणे व हयगयीने चालविल्याने फिर्यादी यांचे आईचा डावा पाय बसच्या पाठीमागील चाकामध्ये गेल्याने डाव्या पायाचा मांडीच्या खाली भागाचा चेंदामेंदा झाला. तसेच उजवा पायाच्या पंजावरुन बसचे पाठीमागील चाक गेल्याने उजव्या तसेच डाव्या पायास गंभीर दुखापत होवुन फिर्यादी यांचे आईचे मरणास कारणीभूत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.वाय.बी.पाटील, मो.नं.९६५७०१७४७४ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे.१३५/२०२४,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | प्रतिक प्रकाश लाहिगुडे पोलिस अमंलदार नेमणुक स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपीत** | कॅान्ट्रक्टर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०४/२०२४ रोजी १४/३० वा. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,ए.विंग मुकुंदनगर पुणे येथिल ७ व्या मजल्यावरील रुममध्ये |
| **तपशिल** | यातील मयत इसम शंकर भद्रीया पातलावत -राठोड वय ४१ व त्यांची पत्नी टाईल फरशिचे काम झाल्यानंतर फरशी पुसण्याचे काम करीत असताना तेथिल लाईटचा बोर्ड बाजुला घेताना शंकर पातलावत -राठोड यांना करंट लागला असुन तेथिल लाईट बोर्ड मधील वायर पासुन धोका असल्याचे कॅान्ट्रक्टर यांना सांगुनही त्यांनी अविचाराने व हयगयीने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यामधुन बाहेर आलेल्या लाईटचे वायर मधुन करंट लागुन खाली पडल्यामुळे शंकर पातलावत -राठोड, यांचे डोक्यास गंभिर मार लागुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.जगताप मो.नं.७०२०७८२२४९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे.१८७/२०२४,भादविक ३०४(अ),३३६,३४ |
| **फिर्यादी** | नदिम तांबोळी वय ४० वर्षे, रा.वडगांवशेरी पुणे |
| **आरोपीत** | खालसा जिम,मधील सुरक्षा रक्षक व व्यवस्थापक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १६/०४/२०२४ रोजी दुपारी १४/३० ते १५/३० वा.चे सुमारास खालसा जिम,संघर्ष चौकाजवळ,चंदननगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा अतिक नदिम तांबोळी वय १३ वर्षे, हा त्याचे मित्रासह खालसा जिम,पुणे या ठिकाणी असलेल्या स्विमींग टॅंकमध्ये पोहण्यासाठी गेला असता,त्यास पोहताना,दम लागल्याने त्या ठिकाणी उपस्थित असणारे सुरक्षा रक्षकाने व खालसा जिमकडील व्यवस्थापकाने कोणत्याही प्रकारची सुरक्षा विषयक उपाययोजना न पुरविल्यामुळे तसेच स्विमींग धारकाची काळजी न घेतल्यामुळे फिर्यादी यांचा मुलगा अतिक याचा स्विमींग पुलामधील पाण्यात बुडुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.घोडके मो.नं.७५८८१७००८० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे.४१६/२०२४,भादविक १६०,४२७,१४३,१४५,१४६,१४७,१४९,५०४,मपोका.११०/११७ |
| **फिर्यादी** | सचिन गोरख थोरात, पोलिस अमंलदार नेमणुक कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर. |
| **आरोपीत** | दहा इसम व इतर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०४/२४ रोजी २१/०० मेफर एलिगंझा सोसायटी समोरुन एनआयबीएम रोडकडे जात असताना उज्वला सोसायटी समोर,कोंढवा खुाा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व सपोनि पठाण असे लोकसभा निवडुकीच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करित असताना अदनान बेग,वय २४ वर्ष रा.कोंढवा पुणे यांच्या चारचाकी गाडीचा धक्का यातील नमुद इसमाच्या मोटार सायकलला लागला होता. त्या कारणावरुन अदनान बेग याने त्याचे साथीदार व दुस-या गटातील इसम याने त्याचे साथीदार यांना बोलावुन घेवुन गाडीच्या अपघाताच्या कारणावरुन वाद करुन एकमेकांना शिवीगाळ करुन आपआपसात झोबाझोबी करुन भांडणे करित असताना त्यांना थाबविण्याचा प्रयत्न करुन देखील ते फि यांचे काहीएक न ऐकता भांडण करित राहिले व सदर भांडणे सपोनिरी पठाण हे सोडवित असताना त्यातील इसमांनी त्यांचा आय फोन कंपनीचा मोबाईल रस्त्यावर टाकुन त्याचे २२०००/-रु.चे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.शिंदे मो.नं.९४२०००१९९५ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे.१२७/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५६ वर्ष रा.सदाशिवपेठ पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना मोबाईल ॲप वापरण्यास भाग पाडुन व्हॉटसअप वरुन वेळोवेळी गुंतवणुकीसाठी पैसे भरावयास लावुन कुठलाही परतावा न देता यांना यातील मोबाईल धारकाने शेर मार्केट ट्रेडिंग साठी गुंतवणुकीतुन अतिरिक्त कमाईचे अमिष दाखवुन फिर्यादी यांची ५०,०१,०००/- रुपये एवढया रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) राऊत मो.नं.९८६७७९९६६१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**